# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, सोलापूर

(गृह शाखा)

**दुरध्वनी क्रमांक** - 0217- 2731020 **ई मेल** - dcbsolapur@gmail.com

वाचा:-
१. गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.आरएलपी-०६२१/प्र.क्र.१४४/विशा १ ब, दि. २९.०६.२१.
२. या कार्यालयाचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश जा.क्र.२०२१/डिसीबी-०२/आरआर-३९४३, दिनांक १४.०८.२०२१.
३. या कार्यालयाचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश जा.क्र.२०२१/डिसीबी-०२/आरआर-४०८९, दिनांक २१.०८.२०२१.
४. भारतीय साथरोग प्रतिबंध कायदा १८९७.
५. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५.
६. सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र. कोरोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५ दि. १४ मार्च, २०२०.
७. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचेकडील क्रं. कोरोना -२०२१/प्र.क्र.३६६/आ-५ दि. ११.०८.२०२१, १६.०८.२१.

---

जा.क्र. २०२१/डिसीबी/०२/आरआर/ ४२४५ दिनांक :- ०८/०९/२०२१

**विषय :- सार्वजनिक गणेशोत्सव २०२१ मार्गदर्शक सूचना**
फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ नुसार सोलापूर जिल्ह्यात कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत.

**आदेश :-**

ज्याअर्थी, कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता या वर्षीचा गणेशोत्सव साध्या पद्धतीने साजरा करणेबाबत गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांनी वरील वाचा क्र. १ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

त्याअर्थी, मी मिलिंद शंभरकर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कोरोना (कोव्हीड-१९) विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सोलापूर जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय सोलापूर ची हद्द वगळून) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने या कार्यालयाकडील वाचा क्र. २ व ३ मधील तरतूदीस अधिन राहून यावर्षी असणारा गणेशोत्सव साधेपणाने साजरा करणेकामी खालीलप्रमाणे आदेश जारी करीत आहे.

१. सार्वजनिक गणेशोत्सवासाठी गणेशोत्सव मंडळानी महापालिका/स्थानिक प्रशासन यांची त्यांचे धोरणानुसार यथोचित पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.
२. कोविड-१९ मुळे उद्धवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता महापालिका तसेच संबंधित स्थानिक प्रशासनाचे मंडपांबाबतचे धोरण यांचेशी सुसंगत असे मर्यादित स्वरुपाचे मंडप उभारण्यात यावेत. या वर्षीचा गणेशोत्सव साध्या पद्धतीने करणे अपेक्षित असल्याने घरगुती तसेच सार्वजनिक गणपतींची सजावट करतांना त्यात भपकेबाजी नसावी.
३. श्रीगणेशाची मुर्ती सार्वजनिक मंडळांकरीता ४ फूट व घरगुती गणपतीकरीता २ फूटांच्या मर्यादेत असावी.
४. या वर्षी शक्यतो पारंपारिक गणेश मुर्ती ऐवजी घरातील धातू/संगमवर आदी मुर्तीचे पूजन करावे. मुर्ती शाडूची/पर्यावरणपूरक असल्यास त्याचे विसर्जन शक्यतो घरच्या घरी करावे. विसर्जन घरी करणे शक्य नसल्यास नजिकच्या कृत्रीम विसर्जन स्थळी विसर्जन करण्यात यावे.
५. उत्सवाकरीता वर्गणी/देणगी स्वेच्छेने दिल्यास त्यांचा स्वीकार करावा. जाहिरातींच्या प्रदर्शनामुळे गर्दी आकर्षित होणार नाही असे पाहावे. तसेच आरोग्य विषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास पसंती देण्यात यावी.
६. सांस्कृतिक कार्यक्रमांऐवजी आरोग्य विषयक उपक्रम/शिबीरे (उदा. रक्तदान) आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे आणि त्याद्वारे कोरोना, मलेरिया, डेंग्यु इत्यादी आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता यांबाबत जनजागृती करण्यात यावी.



Scanned with CamScanner

७. लागू करण्यात आलेले Level of Restrictions for Breaking the Chain या बाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार इतर निर्बंध कायम राहतील. त्यामध्ये गणेशोत्सवानिमित्त कोणतीही शिथीलता देता येणार नाही.

८. आरती, भजन, किर्तन वा अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित करतांना गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच ध्वनी प्रदुषणासंदर्भातील नियमांचे व तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

९. श्रीगणेशाचे दर्शनाची सुविधा ऑनलाईन, केबल नेटवर्क, वेबसाईट व फेसबुक इत्यादीद्वारे उपलब्ध करुन देण्याबाबत जास्तीत जास्त व्यवस्था करण्यात यावी.

१०. गणतपी मंडपांमध्ये निर्जंतुकीकरणाची तसेच थर्मल स्क्रीनिंगची पर्याप्त व्यवस्था करण्यात यावी. प्रत्यक्ष येऊन दर्शन घेऊ इच्छिणा-या भाविकांसाठी शारिरीक अंतराचे (फिजीकल डिस्टन्सींग) तसेच स्वच्छतेचे नियम (मास्क, सॅनीटायझर इत्यादी) पाळण्याकडे विशेष लक्ष देण्यात यावे.

११. श्रींच्या आगमन व विसर्जन मिरवणूका काढण्यात येऊ नयेत. विसर्जनाच्या पारंपारिक पद्धतीत विसर्जन स्थळी होणारी आरती घरीच करून विसर्जन स्थळी कमीत कमी वेळ थांबावे. लहान मुले आणि वरीष्ठ नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टीने विसर्जनस्थळी जाणे टाळावे. संपूर्ण चाळींतील/इमारतीतील सर्व घरगुती गणेशमुर्तीच्या विसर्जनाची मिरवणूक एकत्रितरित्या काढण्यात येऊ नयेत.

१२. महापालिका, विविध मंडळे, गृहनिर्माण संस्था, लोक प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था इत्यादींच्या मदतीने गणेशमुर्तींच्या विसर्जनाकरीता कृत्रीम तलावांची निर्मिती करण्यात यावी.

१३. कोविड-१९ या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैदयकीय शिक्षण विभाग तसेच संबंधित महापालिका, पोलीस, स्थानिक प्रशासन यांनी विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या आदेशानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिद्ध झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती/ संस्था अथवा संघटना यांचेवर भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतूदीनुसार दंडनिय/ कायदेशीर कारवाईस पात्र असून आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, साथ रोग नियंत्रण कायद्यातील तरतूदी आणि इतर कायदे आणि विनियम यानुसार कारवाई करणेत येईल. अशा व्यक्ती, संस्था अथवा संघटना यांचे विरुद्ध संबंधित पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांनी कारवाई करावी.

सदरचा आदेश दि. ०८.०९.२०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

(मिलिंद शंभरकर,भा.प्र.से.)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर**

**प्रत- माहितीस्तव सादर :-**

१. मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष), मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे

**प्रत - आवश्यक कार्यवाहीस्तव :-**

१. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर
२. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
३. पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर
५. अधिष्ठाता, डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर
६. जिल्हा शल्यचिकित्सक, सोलापूर
७. सर्व उपविभागीय दंडाधिकारी, ----------------
८. सर्व तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी ----------------
९. सहायक कामगार आयुक्त, सोलापूर
१०. जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर
११. केंद्र संचालक आकाशवाणी केंद्र सोलापूर यांना प्रसिद्धीस्तव.
१२. राष्ट्रीय सुचना-विज्ञान केंद्र (NIC) जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर



Scanned with CamScanner